**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महोदय, मागील अधिवेशनाच्या वेळी म्हणजे २१ नोव्हेंबरला उत्तर देण्यात आले होते की, "एक महिन्याच्या आत करू" १३ मार्चला यासंबधी निर्णय झालेला आहे मुळ शासन निर्णयास ही दुरूस्ती केली आहे. म्हणून ज्या तारखेपासून मुळ शासन निर्णय अंमलात आलेला आहे त्या तारखेपासून ही दुरूस्ती लागू करणार आहात काय?

**श्री. अनिल देशमुख** : अध्यक्ष महोदय, ह्यासंबधी १३ मार्चला शुध्दिपत्रक काढले आहे.

**सभापती** : मा. सदस्यांचे म्हणणे असे आहे की ही १३ मार्चला दुरूस्ती केली आहे ती पुर्वलक्षी आहे काय?

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महोदय, मुळ शासन निर्णयात १३ मार्चला शुध्दीपत्रक काढले आहे म्हणजे मुळ शासन निर्णयाला दुरूस्ती केली आहे. ती तेव्हापासूनच लागू होईल ना?

**सभापती** : प्रश्न अगदी साधा आहे की ज्यावेळेस शासन निर्णय काढण्यात आला त्या तारखेपासून ही १३ मार्चला केलेली दुरूस्ती लागू होणार काय?

**श्री. अनिल देशमुख** : अध्यक्ष महोदय, होय.

## *उच्च माध्यमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण विषय शिक्षकांच्या अर्हतेबाबत.*

**महाराष्ट्र शासन : शालेय शिक्षण विभाग,**

शुध्दीपत्रक, क्रमांक एचएसी-१३९४/२०२७३/(१/९४)/उमाशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

**दिनांक :- १३ मार्च, १९९५.**

***संदर्भ*** *:- १) शासन पत्र, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एचएससी-१३८० /५६७११(५६३६/८०)/उमाशि-१, दिनांक २५.१.१९९०.*

*२) शासन निर्णय, क्र.एचएससी-१३८०/५६७११(५६३६/८०)/उमाशि-१, दिनांक १४ ऑक्टोबर, १९९२.*

**शासन शुद्धिपत्र** :- शासन पत्र, दिनांक २५.१.१९९० अन्वये उच्च माध्यमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण शिक्षकांसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक व प्रशैक्षणिक अर्हता विहित करण्यात आली आहे :-

अ) उच्च माध्यमिक स्तरावर इतर सामान्य विषयांबरोबर शारीरिक शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शारीरिक शिक्षण शिक्षकांची शैक्षणिक व प्रशैक्षणिक अर्हता पदव्युत्तर पदवी (व्दितीय श्रेणी) सामान्य विषय/ बी.पी.एड./ एच.डी.एस. किंवा बी.एड. (शारीरिक शिक्षण) किंवा डी.पी.एड.

किंवा

ब) उच्च शिक्षण स्तरावर फक्त शारीरिक शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शारीरिक शिक्षण शिक्षकांची शैक्षणिक व प्रशैक्षणिक अर्हता विद्यापीठाची पदवी (व्दितीय श्रेणी) व एम.पी.एड. (व्दितीय श्रेणी) म्हणजेच शारीरिक शिक्षण विषयातील पदव्युत्तर पदवी (व्दितीय श्रेणी).

२. शारीरिक शिक्षण शिक्षकांसाठी विहित करण्यात आलेल्या वरील "ब" येथील अर्हतेमध्ये विद्यापीठाची पदवी व एम.पी.एड. या दोन्ही ठिकाणी व्दितीय श्रेणीची अट नमूद करण्यात आलेली आहे.

३. शासनाने आता याबाबत असा निर्णय घेतला आहे की, वरील "ब" येथे नमूद केलेल्या शारीरिक शिक्षण शिक्षकाच्या अर्हतेत विद्यापीठाच्या पदवीची "व्दितीय श्रेणीची" अट रद्द करण्यात येत आहे.

**मोहन आवटे**

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

**पाठविले हे खरे आहे काय?"** या प्रश्नाला **"होय"** असे उत्तर दिले आहे. त्या निवेदनाच्या पहिल्याच परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "११ जून १९९२ ला विद्यापीठाच्या निर्धारण समितीने निर्णय घेतला आहे" आणि त्या निर्णयाची प्रत या निवेदनासोबत जोडली आहे हे खरे आहे काय?

**श्री.बबनराव घोलप :** काही कारणास्तव निर्णय घेण्याला विलंब झाला. कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली नव्हती. ही पूर्तता करण्यात आल्यावर ती वेतनश्रेणी आता लागू केली आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, विद्यापीठाच्या असेसमेंट कमिटीने ११ जून १९९२ रोजी निर्णय घेतला आहे आणि त्या निर्णयाची प्रत त्या निवेदनासोबत जोडली आहे. त्याची अंमलबजवणी १९९२ मध्येच करण्यात आली आहे. डायरेक्टरनी त्यांच्या दिनांक २३.१०.१९९२ च्या पत्रान्वये हे मान्यही केले आहे आणि या पत्राची प्रतही निवेदनासोबत जोडली आहे. डायरेक्टरनी दि. ११.६.१९९२ चा विद्यापीठाच्या निर्धारण समितीचा निर्णय २३.१०.१९९२ ला मान्य केला ही गोष्ट खरी आहे काय?

***शिक्षणाचा आकृतीबंध अभ्यासक्रम (१० +२ +३) शासकीय/ अशासकीय संस्थांना जोडलेल्या उच्च माध्यमिक वर्गावरील व्यवसाय विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना दि. १६.१०.१९९२ पासून सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत.***

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,

*शुध्दीपत्रक क्रमांक : पीटीएस २२९२/६५६३९/(२३६५)व्यशि-४,*

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक १२ डिसेंबर १९९४.**

***संदर्भ :-*** *१) शासन निर्णय क्रमांक पीटीएस २२९२/६५६३१/(२३६५)/व्यशि-४, दि. २५ मार्च १९९४.*

*२) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. एचएससी-१३९२/४६३६७ /(१५४४)/उमाशि-१, दि. २२ जानेवारी, १९९३.*

*३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : एचएससी-१३९३/(१८९९)/उमाशि-१, दि. २८ डिसेंबर १९९३.*

*४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२३९३/(१०६)/माशि-२, दि. ८ मार्च १९९४.*

**शुध्दीपत्रक** : अशासकीय माध्यमिक शाळेतील व महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक एचएससी १३९०/८०३०/९०/उमाशि-१, दि. १६.१०.१९९२ अन्वये सुधारित व्दिस्तरीय वेतनश्रेणी दि. १६.१०.९२ पासून लागू केली. त्याच धर्तीवर या विभागाने दि. २५ मार्च, १९९४ च्या शासन निर्णयातील संदर्भ क्र. १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये शासकीय/ अशासकीय संस्थांना जोडलेल्या उच्च माध्यमिक वर्गावरील व्यवसाय विषय शिकविणाऱ्या शिक्षकांना दि. १६.१०.९२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने व्दिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. सदर शासन निर्णयात ज्या अटी घातलेल्या आहेत, त्या अटीच्या संदर्भात शालेय शिक्षण विभागाने संदर्भ क्र. (२) ते (४) मध्ये नमूद केल्यानुसार वेळोवेळी ज्या सुधारणा केल्या त्या सुधारणांना अनुसरून सदर शिक्षकांना या शासन निर्णयाव्दारे वरील प्रमाणे शर्ती व अटी लागू करण्यात येत आहेत.

(१) प्रशिक्षण अर्हतेसह १२ वर्षाची अर्हताकारी सेवा (उच्च माध्यमिक स्तरावरील) च्या ऐवजी

(१) उच्च माध्यमिक स्तरावरील नेमणुकीच्या दिनांकापासून १२ वर्षाची अर्हताप्राप्त सेवा पूर्ण पदावनती/प्रतिनियुक्ती/सेवाखंड या वगळून उच्च माध्यमिक स्तरावर नेमणुकीच्या दिनांकापासून पूर्ण १२ वर्षे झालेली सेवा विचारात घ्यावी.

(३) तीन आठवड्याचे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणेच्या ऐवजी

(३) (१) माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळातील/कनिष्ठ महाविद्यालयातील जून ९३ अखेर वयाची ५५ वर्षे पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षणातून सूट देण्यात येईल.

(२) राज्यातील खाजगी उच्च माध्यमिक शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील जे शिक्षक दि. १ जानेवारी १९९७ पर्यंत विहित प्रशिक्षण पूर्ण करण्याची हमीपत्र देतील अशा अर्हताप्राप्त शिक्षकांना वरिष्ठश्रेणी मंजूर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**ह.भि.तायडे**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**श्री.बबनराव घोलप** : उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, महाविद्यालयातील "अनेक प्राध्यापकांनी ६ ऑगष्ट १९९४ रोजी किंवा त्या दरम्यान मा. समाजकल्याण मंत्री यांचेकडे निवेदन पाठविले हे खरे आहे काय?" असा प्रश्न विचारला आहे त्याला मा.मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. जे निवेदन मंत्रीमहोदयांकडे पाठविण्यात आले त्याची प्रत माझ्याजवळ आहे तरी हे निवेदन माननीय मंत्री महोदयांकडे आहे काय?

**श्री.बबनराव घोलप** : हे निवेदन माझ्याकडे आता नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, ज्या निवेदनावर हा प्रश्न आधारीत आहे ते निवेदन मंत्री महोदयांजवळ आता नाही. जे निवेदन सादर करण्यात आले होते ते न पाहताच या प्रश्नाचे उत्तर तयार करण्यात आले आहे काय?

**श्री.बबनराव घोलप :** हे निवेदन माझ्याकडे आता नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** हे निवेदन आपल्याला मिळाले किंवा नाही यावर हा प्रश्न आहे. **आपण या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिले आहे. असे असतांना हे निवेदन आपल्याजवळ आता नाही असे आपण कसे काय सांगत आहात?**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी मंत्री महोदय अजून तयार झालेले नाहीत कारण ते नवीन आहेत.

**श्री. अरूण मेहता** : अध्यक्ष महाराज, प्रश्न क्रमांक १ ला "होय" असे उत्तर दिलेले आहे आणि ते निवेदनच मंत्री महोदयांकडे आता नसेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवला पाहिजे आणि उद्या घेतला पाहिजे.

**सभापती** : प्रश्न राखून ठेवल्यानंतर तो केव्हा घ्यावयाचा हे मी ठरवीन. तरी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना मी विचारू इच्छितो की हा प्रश्न राखून ठेवावा असे आपले मत आहे काय?

**श्री.बी.टी.देशमुख** : होय ! अध्यक्ष महाराज.

**सभापती** : ठीक आहे. हा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

*मा. सभापतींच्या आदेशानुसार सोमवार, दिनांक २७ मार्च १९९५ रोजी राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक २.*

**यु.जी.सी. वेतनश्रेणीची थकबाकी देण्यामध्ये होणारा विलंब**

**महाराष्ट्र विधानपरिषद पहिले अधिवेशन, १९९५**

**सोमवार, दिनांक ३ एप्रिल १९९५**

विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २ सर्वश्री **बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : सन्माननीय समाजकल्याण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) १ जानेवारी १९८६ पासून अमलात आलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाची वेतनश्रेणी लागू केल्यामुळे द्यावयाची थकबाकी इतर सर्व महाविद्यालयातील प्राध्यापकांना देण्यात आली असली तरी समाज कल्याण खात्याच्या अखत्यारीत असलेल्या नागपूर येथील नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ सोशल वर्क या महाविद्यालयातील प्राध्यापकांना मात्र ती अजुनहि अदा करण्यात आलेली नाही, अशी तक्रार करणारे एक निवेदन या महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी ६ ऑगस्ट १९९४ रोजी किंवा त्या दरम्यान मा. समाज कल्याण मंत्री यांचेकडे पाठविले हे खरे आहे काय ?

२) खरे असल्यास उक्त तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे.

३) उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबन घोलप, मा. समाजकल्याण मंत्री.** (१) होय.

(२) नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ सोशल वर्क नागपूर या महाविद्यालयातील ३ प्राध्यापकांना १.१.१९८६ पासून अंमलात आलेली विद्यापीठ आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली नव्हती. ती आता लागू करण्यात आली असून १.१.८६ पासून ते ३१.३.९५ ची थकबाकी मंजूर करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, हा प्रश्न राखून ठेवण्यात आल्यामुळे ह्या प्रश्नास न्याय मिळाला आहे. मा. मंत्री महोदयांनी ह्या प्रकरणी समाधानकारक कारवाई केली आहे. आता मला अशी माहिती पाहिजे की, दि.

*मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदे - उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने पदे भरणे, पदे आरक्षणातून मुक्त करणे.*

**महाराष्ट्र शासन : सामान्य प्रशासन विभाग,**

***शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०९४/सीआर-५७/९४/१६-ब***

*मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक : ५ डिसेंबर १९९४.*

***पहा :*** *शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/(क)/१६-ब दिनांक २७ मार्च १९९१.*

***प्रस्तावना***

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०६४/१११/ ने दिनांक ९.४.१९६५ अन्वये मागासवर्गीयांच्या विविध प्रवर्गाकरिता सरळ सेवा प्रवेशाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले होते व ते २२ मार्च १९९४ पर्यंत अंमलात होते. दिनांक ९.४.१९६५ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागासवर्गीयाकरिता असलेले आरक्षण भरले न गेल्यास अनुशेष म्हणून दाखविण्याची तसेच ते पुढे ओढण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/(क)/१६-ब, दिनांक २७ मार्च, १९९१ च्या आदेशानुसार अदलाबदलीने पदे भरतांना ती फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गामधूनच भरण्याची तरतूद आदेशात करण्यात आलेली होती. मंडल आयोगाच्या शिफारसीनुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक २३ मार्च १९९४ अन्वये मागासवर्गीयांना ज्या विविध प्रवर्गाकरिता आरक्षण विहित करण्यात आलेले आहे त्यामध्ये इतर मागासवर्गीयांकरिता एकूण १९ टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे. या आरक्षित पदांपैकी काही पदे भरली न गेल्यास ती पुढील ५ भरती वर्षापर्यंत अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतूद करण्यात आलेली असून ती अदलाबदलीने भरण्याबाबत देखील दिनांक २३ मार्च १९९४ च्या शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गुणवत्तेनुसार जे मागासवर्गीय उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरतील त्यांची गणना आरक्षित पदावर केली जाणार नाही अशीही तरतूद दिनांक २३ मार्च १९९४ च्या आदेशात करण्यात आलेली आहे.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या सरळ सेवा भरती तसेच पदोन्नतीमध्ये आरक्षित पदे उमेदवाराअभावी भरली न गेल्यास ती कशा प्रकारे भरण्यात यावीत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या गोष्टीचा सर्वंकष विचार करून शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

**शासन निर्णय**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९१/२५५१/(क)/१६-ब दिनांक २७ मार्च १९९४ मधील आदेश अधिक्रमित करून खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**सरळ सेवा भरती**

**अ)** अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्गीय (इ) या प्रवर्गाकरिता निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार भरती करण्यासाठी त्या त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अशी पदे ५ भरती वर्षापर्यंत रिक्त ठेवावी व या ५ भरती वर्षात त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत, असे प्रयत्न करूनही उमेदवार प्राप्त झाला नाही तर ६ व्या वर्षी खाली उल्लेख केल्याप्रमाणे अदलाबदलीने ही पदे भरण्यात यावीत. ६ व्या वर्षीही त्या प्रवर्गाचा किंवा अदलाबदलीसाठी दुसऱ्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ७ व्या वर्षी खुल्या प्रवर्गाने उमेदवार भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर करण्यात यावी. त्यासाठी आवश्यक त्या समर्थनानीशी प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावा. ६ व्या वर्षी पदे खालील प्रवर्गाने अदलाबदलीने भरण्यात यावीत :-

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती )( या दोन प्रवर्गातच अदलाबदली करण्यात यावी.

विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) )( (मूळच्या १४ व तत्सम जाती) (मूळच्या २८ व तत्सम जमाती) या दोन प्रवर्गातच अदलाबदली करण्यात यावी.

भटक्या जमाती (क) धनगर व तत्सम भटक्या जमाती (ड) वंजारी व तत्सम इतर मागासवर्गीय (इ) )( या तीन

प्रवर्गात अदलाबदली करण्यात यावी.

**ब)** प्रशासकीय व जनहितास्तव पदे ५ भरतीवर्षापर्यंत रिक्त ठेवणे शक्य नसेल तर पद तात्पुरते बिगर राखीव करण्याचा प्रस्ताव संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवावा. अशा प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिल्यानंतर वर्ग-१, व वर्ग-२ च्या पदासंदर्भात प्रस्ताव त्या त्या विभागाच्या सचिवांनी मा. मंत्री, समाजकल्याण व आदिवासी विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्यांकडे सामान्य प्रशासन विभागामार्फत मान्यतेसाठी पाठवावेत.

**क)** मंत्रालयातील, विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षीत करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावेत व सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेनंतर विभागांनी मा. मंत्री (स.क.) आणि मा. मंत्री (आदिवासी विकास) यांची मान्यता घ्यावी.

**ड)** वर नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

**पदोन्नती**

**(१)** अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ विमुक्त जमाती(अ)/भटक्या जमाती (ब) यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण ठेवण्यात आले आहे. शासन निर्णय क्र. बीसीसी-१०७२/जे, दिनांक २३ मे १९७४ अन्वये त्यासाठी ५० बिंदू नामावली निर्धारित केली आहे. त्याचा अवलंब करावा. या नामावलीत विमुक्त जाती/भटक्या जमातींचा एकत्रित समावेश करण्यात आला आहे. त्याप्रमाणेच कार्यवाही करावी. या प्रवर्गासाठी निर्धारित केलेल्या प्रमाणानुसार त्या त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर पद भरण्यासाठी ३ भरती वर्षे प्रयत्न करण्यात यावा व त्या प्रवर्गाचे उमेदवार मिळेपर्यंत ते पद ३ भरती वर्षे रिक्त ठेवण्यात यावे. तदनंतर ४ थ्या वर्षी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गातून व विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) या दोन प्रवर्गातूनच आपआपसातून अदलाबदलीने भरण्यात यावे.

**(२)** प्रशासकीय कारणास्तव किंवा जनहितास्तव अशी पदे संबंधित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षीत करावयाची असल्यास यासंबंधीचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे मंजुरीसाठी पाठवावा. सामान्य प्रशासन विभागाने या पदाचे राखीव स्वरूप तात्पुरते काढून टाकण्यास मान्यता दिली तर एकत्रित निवडसूचित समाविष्ट असलेल्या इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करून रिकाम्या जागा तात्पुरत्या स्वरुपात भरता येतील व त्या त्या गटाची राखीव पदे त्या गटाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ४ थ्या वर्षी वर नमूद केल्याप्रमाणे पद अदलाबदलीने भरावे. ४ थ्या वर्षीही अदलाबदलीसाठी मागासवर्गीयांचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर पद कायमचे अनारक्षीत झाले असे समजून इतर प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गाने (ज्यात मागासवर्गीयही असतील) भरण्यात यावे यासाठीही सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी.

**(३)** गट - १ व गट - २ ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधीचे प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायासाठी पाठवावेत व नंतर मा. मंत्री, समाजकल्याण, मा. मंत्री, आदिवासी विकास व सबंधित विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्यांकडे मंजुरीसाठी पाठवावेत.

**(४)** मंत्रालयीन विभागातील व विभागांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील वर्ग-३ व ४ थी आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबधीचे प्रस्ताव योग्य त्या समर्थनासह संबंधित विभागाच्या सचिवांच्या प्रमाणपत्रासह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी पाठवावेत.

**(५)** वर नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात यावेत.

**(६)** गट-१ व गट-२ च्या निवड सूचीतील मागासवर्गीयांच्या अधिक्रमास मान्यता देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, मंत्री (समाजकल्याण) मंत्री (आदिवासी विकास) व विभागाचे मंत्री यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्र्याकडे अशी प्रकरणे सादर करण्यात यावीत.

**(७)** ज्येष्ठतेनुसार मागासवर्गीय उमेदवार पदोन्नतीला पात्र असेल परंतु त्यांच्या प्रवर्गाचा आरक्षित बिंदू नसेल तर अशा कर्मचाऱ्यास आरक्षित बिंदू नाही म्हणून पदोन्नती नाकारू नये.

**सर्वसाधारण सूचना**

**१)** राखीव जागेवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/ पदोन्नती देतांना "आपली नियुक्ती/पदोन्नती मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली असून संबंधित उमेदवार प्राप्त झाल्यानंतर किंवा अदलाबदलीने पद भरल्यानंतर आपली नियुक्ती/पदोन्नती संपुष्टात येईल." असा उल्लेख नियुक्ती/ पदोन्नतीच्या आदेशात न चुकता करण्यात यावा.

**२)** राखीव जागेवर इतर उमेदवारांची तात्पुरती नियुक्ती/पदोन्नती दिल्यास अशा उमेदवारांची नोंद कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात येऊ नये. त्यांची नोंद

---

१.१.८६ ते ३१.३.९३ पर्यंतची जवळ जवळ दोन लाख रूपयाची थकबाकी प्रत्यक्षात देण्यात आली आहे हे खरे आहे काय? तसेच १९९३ ते १९९५ पर्यंतची जवळ जवळ ४८ हजार रूपयाची थकबाकी प्रत्यक्षात गेल्या २-४ दिवसात देण्यात आली आहे हे खरे आहे काय?

**श्री. बबनराव घोलप** : अध्यक्ष महोदय, सदरची थकबाकीची रक्कम चेकव्दारे अदा करण्यात आली आहे.

*********

# विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचा धडक कार्यक्रम आयोजित करण्याबाबत.

***महाराष्ट्र शासन :*शासन निर्णय : एनजीसी-१२९४/(२७२९)/विशि-४**

**उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,**

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.**

***दिनांक १० नोव्हेंबर, १९९४.***

***वाचावे :-*** *(१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी-१२८६/(१२३४)/विशि-४ दिनांक २७.२.८९ (२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी-१२८९/(१६०५) विशि-४ दिनांक १५ डिसेंबर, १९८९. (३) शासन शुद्धीपत्रक क्रमांक : एनजीसी-१२४९/(१६०५) विशि-४, दिनांक २० जुलै १९९३. (४) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांचे अर्ध शासकीय पत्र क्रमांक : यूएनआय. १९९०/रिफ्रे-कोर्स/९-अ, दिनांक ५.२.९४.*

## *शासन निर्णय*

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ अनुसार उच्च शिक्षण अधिक गतिशील होणे आवश्यक आहे त्यासाठी खालील बाबींवर भर देण्याचे उद्दिष्ट आहे. १. अस्तित्वांत असलेल्या संस्थांचे दृढीकरण व विस्तार २. स्वायत्त महाविद्यालये व विद्यापीठीय विभागांचा विकास. ३. अभ्यासक्रमाची पुनर्रचना. ४. शिक्षकांचे प्रशिक्षण. ५. संशोधनावर भर देणे. ६. उच्च शिक्षणाची क्षमता वाढविणे. ७. राज्य स्तरावर व राष्ट्रीय पातळीवर समन्वय साधण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे. ८. शिक्षकांची देवाणघेवाण. ९. आर्थिक बाबी. १०. पुनर्विलोकन व देखभाल.

वरील सर्व कार्यक्रमामध्ये शिक्षक प्रशिक्षणाला विशेष महत्त्व आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या कृती कार्यक्रमानुसार केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षकांचा दर्जा वाढवून त्यांना त्यांचे अंगिकृत कार्य करण्यास प्रवृत्त करण्यासाठी अनेक निर्णय घेतले आहेत. यात वेतनश्रेणीची पुनर्रचना, शैक्षणिक अर्हता व कार्य याच्याशी निगडित व्यावसायीक प्रगतीच्या संधी साधण्यासाठी प्रोत्साहने व प्रशिक्षणाच्या संधी यांचा समावेश होता. राज्य शासनाने सुधारित वेतनश्रेणी मंजूर करतांना महाविद्यालयीन शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी देय होण्यासाठी ३ ते ४ आठवड्याचे उजळणी वर्ग / उद्‌बोधन वर्ग पूर्ण करण्याची अट घातलेली आहे. शासन निर्णय क्रमांक एनजीसी-१२८६/(१२३४)यूएनआय४ दिनांक २७.२.८९ अन्वये २ प्रशिक्षण वर्ग पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१.१२.९३ पर्यंत विहित करण्यात आलेली होती. तथापि राज्यातील महाविद्यालयीन शिक्षक वर्गाच्या प्रमाणात प्रशिक्षणाच्या सोयी पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नसल्यामुळे शासन शुद्धीपत्रक क्रमांक एनजीसी-१२८९/(१६०५)यूएनआय४, दिनांक २०.७.९३ अन्वये, ही अट काढून टाकली आहे. तथापि शिक्षकांना उजळणी वर्गाची संधी देवुनही त्यांनी जाणूनबुजून या संधीचा फायदा घेतला नाही तर त्यांची पुढील वेतनवाढ रोखण्यांत येईल व त्यांना वरिष्ठ/निवडश्रेणी पासून वंचित रहावे लागेल. त्यामुळे राज्यांत महाविद्यालयीन शिक्षकांसाठी उद्‌बोधन वर्गाची/उजळणी वर्गाची पुरेशी सोय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

वरील गोष्टीचा विचार करून शासनाने राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी प्रशिक्षणाचा धडक कार्यक्रम खालील प्रमाणे आयोजित करण्याचे ठरविले आहे.

प्रत्येक उजळणी वर्गासाठी ५० शिक्षक याप्रमाणे प्रत्येक वर्षी किमान ११० वर्गांचे आयोजन करण्यांत यावे. विद्यापीठ निहाय प्रशिक्षण वर्गांची संख्या खालील प्रमाणे असावी. मुंबई विद्यापीठ २०, एस.एन.डी.टी.विद्यापीठ १०, पुणे विद्यापीठ १६, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर १२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ १४, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव १०, अमरावती विद्यापीठ, अमरावती १२, नागपूर विद्यापीठ, नागपूर १६, एकूण ११०.

***योजनेची कार्यवाही :-*** प्रशिक्षण आयोजित करण्याच्या कार्यक्रमाची संबंधित विद्यापीठातील ऍकेडमिक स्टाफ कॉलेजेस मार्फत करण्यात यावी. ज्या विद्यापीठांत ऍकेडमिक स्टाफ कॉलेजेस नाहीत त्यामध्ये त्या विद्यापीठांना हे वर्ग आयोजित करण्याची जबाबदारी विद्यापीठ प्रमुखावर सोपविण्यांत येत आहे.

**आर्थिक बाबींची तरतूद :** ५० शिक्षक प्रशिक्षणार्थीच्या एक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यासाठी खालील प्रमाणे खर्च करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. १. ५० शिक्षकांचा प्रवास व दैनिक भत्ता रु. १,१२,०००, २. प्रशिक्षणार्थीना द्यावयाचे साहित्य रु. १०,०००, ३. व्याख्यात्यांचे मानधन व प्रवास भत्ता रु. १०,०००, ४. स्टेशनरी व इतर खर्च रु. ३,०००, रु. १,३५,०००, विज्ञानशाखेतील विषयासाठी लागणारा खर्च रु. २०,००० विज्ञानेतर विषयासाठी लागणारा खर्च रु. १०,००० प्रशिक्षण कालावधी ३ ते ५ आठवडे सरासरी एकूण खर्च रु. १,६५,०००

प्रत्येक प्रशिक्षणार्थी मागे सुमारे ३००० खर्च करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रशिक्षण वर्गावर केलेला खर्च वेतनेतर अनुदानासाठी मान्य खर्च म्हणून धरण्यांत येईल. महाविद्यालयांना देण्यांत येणाऱ्या वेतनेतर अनुदानासाठी मंजूर केलेल्या तरतुदीतून वरील खर्च भागविण्यांत यावा. तसेच ज्या महाविद्यालयातून शिक्षक पाठविले जातील त्या महाविद्यालयीन प्रत्येक शिक्षकामागे रु. ३००० प्रमाणे प्रशिक्षण फी म्हणून संबंधित विद्यापीठाकडे जमा करावी. अशा प्रकारच्या जमा होणाऱ्या रकमेतून संबंधित विद्यापीठ प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करतील. प्रशिक्षण वर्गाचे आर्थिक हिशेब स्पष्टपणे ठेवण्याबाबत शिक्षक संचालकांनी विद्यापीठांना सूचना द्याव्यात. प्रशिक्षण वर्गाच्या जमाखर्चाचे ऑडिट वर्षाअखेरीस करून घेऊन ऑडीटेड स्टेटमेंट सादर करणे विद्यापीठावर संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

कांही विशिष्ट विषयाचे उजळणी वर्ग राज्यांतील संबंधित विषयाच्या शिक्षकांच्यासाठी खाली नमूद केलेल्या विद्यापीठीय/संस्थेत आयोजन करण्यांत यावेत. १. गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था (अभिमत विद्यापीठ) पुणे.: अर्थशास्त्र २. पुणे विद्यापीठ. : तत्त्वज्ञान ३. नागपूर विद्यापीठ, नागपूर : संस्कृत ४. एस.एन.डी.टी. विद्यापीठ : गृहशास्त्र

या धडक कार्यक्रमासाठी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होऊ शकेल या संधीचा लाभ घेणे शिक्षकांवर बंधनकारक राहील. संधी देऊनही या संधीचा लाभ न घेणाऱ्या शिक्षकांच्या पुढील वेतनवाढ रोखून धरल्या जातील व त्यांना वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणी मंजूर केली जाणार नाही. ही बाब सर्व शिक्षकांच्या नजरेस आणण्यांत यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

**(मा.ना.कांबळे)**

*अवर सचिव, महाराष्ट्र शासन*

---

तात्पुरत्या स्वरुपातील स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी. व जसजसे मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होतील तसतसे त्या नोंदवहीतील नोंदी कायम स्वरुपी बिंदू नामावलीत घेण्यात याव्यात.

**३)** सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेसाठी जे जे प्रस्ताव सादर करण्यात येतील ते ते प्रस्ताव संबंधित विभागांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या उपसचिवांनी प्रथम तपासून आपापल्या विभागाच्या सचिवांमार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

**४)** मंत्रालयीन विभागाच्या आधिपत्याखाली असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातील गट-३ व गट-४ च्या सरळ सेवा भरतीतील व पदोन्नतीतील मागासवर्गीयांचे अनारक्षण/अधिक्रमण याबाबत विभाग प्रमुखांनी सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांचे प्रमाणपत्र न चुकता घ्यावे.

**५)** महामंडळे, मंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शासकीय उपक्रम, जिल्हा परिषद, अनुदानित संस्था, विद्यापीठ, सहकारी संस्था/बँका, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादिमधील मागासवर्गीयांची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात बिगर आरक्षित करण्यासंबंधी संबंधित विभागांनी सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने व मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

हे आदेश १ जानेवारी १९९५ पासून अमलात येतील. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शांता शास्त्री)**

शासनाचे प्रधान सचिव

*प्रति,*
*राज्यपाल यांचे सचिव*
*मुख्यमंत्र्यांचे सचिव*
*सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव*
*मुख्य सचिव/अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, सर्व विभागीय आयुक्त , सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.*

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Dr. Sharad Kalnawat, Tilakwadi, Yeotmal-444 001. **PUBLISHER AND ACTING EDITOR :** R. Chittaranjan, Gulmohar Colony, Camp, Amravati-444 602 Composed at :NUTA Office, (for NUTA Bulletin ) Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Someshwar Printing Press, Satidham Market Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 263 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Date of Posting : **24 - 4 - 1995**
Name of the Posting office : R.M.S. Amravati.

**if Undelivered please return to :**
NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan,
Behind Jain Hostel, Maltekadi Road,
Amravati-444 601.